धार्मिक अल्पसंख्यांक विद्यार्थी बहुल शासनमान्य खाजगी अनुदानित/ विना अनुदानित/ कायम विना अनुदानित शाळा, कनिष्ठ महाविद्यालये, औद्योगिक प्रशिक्षण संस्था, नगरपालिका/ नगरपरिषद शाळा व अपंग शाळांमध्ये पायाभूत सोयी सुविधा पुरविण्यासाठी अनुदान योजनेंतर्गत अनुदान वितरण सन २०१८-१९

महाराष्ट्र शासन
अल्पसंख्याक विकास विभाग
शासन निर्णय क्रमांकः अविवि-२०१८/प्र.क्र.१७१/का-६
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२.
तारीख:- ०८ मार्च, २०१९

<u>वाचा :-</u>

१. शासन निर्णय क्रमांक : अविवि-२०१५/प्र.क्र.८०/१५/का-६, दि.०७.१०.२०१५
२. शासन शुध्दीपत्रक क्रमांक : अविवि-२०१०/प्र.क्र.८०/१५/का-६, दि.०८.१०.२०१५
३. शासन निर्णय: अल्पसंख्यांक विकास विभाग क्रमांक : अविवि-२०१८/प्र.क्र.१७१/का.६, दिनांक ३ जानेवारी,२०१९.
४. शासन निर्णय: अल्पसंख्यांक विकास विभाग क्रमांक : अविवि-२०१८/प्र.क्र.१७१/का.६, दिनांक २१ फेब्रुवारी,२०१९.
५. शासन निर्णय : अल्पसंख्यांक विकास विभाग क्रमांक: अविवि-२०१८/प्र.क्र.१७१ (भाग-१)/ का.६, दिनांक २१ फेब्रुवारी, २०१९.
६. जिल्हाधिकारी कार्यालय, नाशिक यांचे पत्र क्र.जा.क्र. नियोजन/कक्ष-१२/संस २/२०१८/५८३, दिनांक १४.१.२०१९.
७. जिल्हाधिकारी कार्यालय,औरंगाबाद यांचे पत्र क्र.जा.क्र.साप्र/अल्पसंख्यांक/२०१८-१९/कावि-२५६, दिनांक २८.२.२०१९.
८. जिल्हाधिकारी कार्यालय, जालना यांचे पत्र क्र.जा.क्र. २०१९/साशा/अल्पसंख्यांक/कावि, दिनांक ०२.०२.२०१९
९. जिल्हाधिकारी कार्यालय, वर्धा यांचे पत्र क्र. का.-जिनिस/अल्पसंख्यांक/२१/२०१९, दिनांक १८.०२.२०१९

<u>प्रस्तावना -</u>

धार्मिक अल्पसंख्याक विद्यार्थी बहुल शासनमान्य खाजगी अनुदानित/विना अनुदानित/कायम विना अनुदानित शाळा, कनिष्ठ महाविद्यालये, औद्योगिक प्रशिक्षण संस्था, नगरपालिका /नगरपरिषद शाळा व अपंग शाळांमध्ये पायाभूत सोयी सुविधा पुरविण्यासाठी अनुदान योजना दि.०७.१०.२०१५ च्या शासन निर्णयान्वये राबविण्यात येत आहे. सदरहू योजनेंतर्गत संबंधित जिल्हाधिकारी कार्यालयाकडून शासनाकडे प्राप्त झालेल्या प्रस्तावातील पात्र शाळांना सन २०१८-१९ या आर्थिक वर्षाकरिता अनुदान मंजूर करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय -

संबंधित जिल्हाधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखालील उच्च स्तरीय निवड समितीने उपरोक्त शासन निर्णयानुसार त्यांचेकडे प्राप्त अर्जांची छाननी केली असून छाननीअंती पात्र शाळांची यादी, शिफारशी व आवश्यक निधीच्या मागणीसह मंजूरीकरिता शासनाकडे पाठविली आहे. सर्व संबंधित जिल्हाधिकारी कार्यालयाकडून प्राप्त झालेल्या प्रस्तावांची दि.०७.१०.२०१५ रोजीच्या शासन निर्णयातील अटी व शर्ती नुसार शासनस्तरावर पुन:श्च छाननी करुन अपूर्ण किंवा त्रुटी असलेले प्रस्ताव अपात्र करण्यात आले आहेत. या

छाननीअंती पात्र ठरलेल्या शाळांची व त्यांस मंजूर करावयाच्या (कमाल मर्यादा प्रत्येक शाळेसाठी रू.२.०० लाख) अनुदानाची रक्कम खालीलप्रमाणे आहे :-

अ.क्र.	विभाग	जिल्हा	पात्र शाळांची संख्या	प्रस्तावित अनुदान (रु. लाखात)
१.	**नाशिक विभाग**	नाशिक	०९	१८,००,०००/-
२.	**औरंगाबाद विभाग**	औरंगाबाद	१२	२४,००,०००/-
३.		जालना	०९	१८,००,०००/-
४.	**नागपुर विभाग**	वर्धा	०१	२,००,०००/-
एकूण			**३१**	**६२,००,०००/-**

उपरोक्त तक्यात दर्शविल्याप्रमाणे एकूण **३१** शाळांना **रु. ६२,००,०००/- (रूपये बासष्ट लाख फक्त)** इतके अनुदान या योजनेंतर्गत या शासन निर्णयाद्वारे मंजूर करण्यात येत असून, सदर निधी संबंधित जिल्हाधिकारी यांच्या स्वाधीन करण्यात येत आहे. संबंधित जिल्हयाचे जिल्हाधिकारी यांना सदर निधीसाठी आहरण, संवितरण व नियत्रंक अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे. यानुसार अनुदान मंजूर केलेल्या पात्र शाळांची नावे, मागणीचे स्वरुप, यापूर्वी अनुदानाचा लाभ घेतल्याचे वर्ष याचा तपशील या शासन निर्णया सोबतच्या सहपत्रामध्ये दर्शविण्यात आला आहे. संबंधित जिल्हाधिकारी, यांच्याकडे सुपूर्द करण्यात आलेल्या निधीच्या मर्यादेत अनुदानाचे वितरण प्रणालीतून (BDS) आहरण व संवितरण करण्यास खालील बाबींच्या पूर्ततेच्या/खातरजमा करण्याच्या अटीच्या अधीन राहून वितरण करण्यास या शासन निर्णयाद्वारे मंजूरी देण्यात येत आहे.

२. जिल्हाधिकारी कार्यालयाकडून शासनाकडे प्राप्त झालेल्या प्रस्तावामध्ये एकाच DIES CODE/ INSTITUTE CODE/लायसन्स क्रमांकांसाठी एकापेक्षा जास्त प्रस्ताव प्राप्त झाल्याचे तसेच एकाच इमारतीत/ आवारातील एकाच संस्थेच्या प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांसाठी एक पेक्षा जास्त प्रस्ताव प्राप्त झाल्याची बाब शासनाच्या निर्दशनास आली आहे. तथापि, दि. ०७.१०.२०१५ रोजीच्या शासन निर्णयातील अटी व शर्तीनुसार एका DIES CODE/INSTITUTE CODE/लायसन्स क्रमांकासाठी फक्त एकदाच अनुदान देण्यात येईल तसेच, एकाच इमारतीत/आवारात एकाच संस्थेच्या प्राथमिक, माध्यमिक, उच्च माध्यमिक अशा वेगवेगळया शाळा/महाविद्यालये हे दिवसभरातील स्वतंत्र वेळापत्रकानुसार वेग वेगळया पाळीत/सत्रात भरत असतील आणि त्यांचे DIES CODE वेगवेगळे असतील अशा परिस्थितीत त्या इमारतीसाठी/आवारासाठी या DIES CODE पैकी फक्त एकाच DIES CODE साठी अनुदान मंजूर करण्यात येईल. संबंधित जिल्हाधिकारी यांनी अनुदान वितरण करण्यापूर्वी शासन निर्णय दि. ७.१०.२०१५ मध्ये विहित केलेल्या अटी व शर्तीचे पालन होईल याची दक्षता घ्यावी.या योजनेंतर्गत शाळांना चालू वर्षात ज्या विनिर्दिष्ट प्रयोजनासाठी निधी मंजूर करण्यात आला आहे, त्याच प्रयोजनासाठी संबंधित शाळांनी निधी खर्ची टाकावा.

३. शाळा, महाविद्यालय, औद्योगिक प्रशिक्षण संस्था, अपंग व नगरपालिका/नगरपरिषद शाळांना अनुदान वितरित करण्यात आल्यानंतर संबंधित शाळा, महाविद्यालय, औद्योगिक प्रशिक्षण संस्था, अपंग व नगरपालिका/नगरपरिषद शाळांनी अनुदान प्रत्यक्ष प्राप्त झाल्यापासून तीन महिन्यांच्या कालावधीत प्रस्तावात नमूद केलेली कामे पूर्ण करणे आवश्यक आहे व त्यानंतर अनुदानाच्या विनियोगाचे विहित नमुन्यातील उपयोगिता प्रमाणपत्र संबंधित जिल्हाधिकाऱ्यांकडे सादर करणे बंधनकारक आहे. सर्व संबंधित शाळा, महाविद्यालय, औद्योगिक प्रशिक्षण संस्था, अपंग व नगरपालिका /नगरपरिषद शाळांकडून प्राप्त झालेल्या उपयोगिता प्रमाणपत्रांचा अहवाल संबंधित जिल्हाधिकारी यांनी शासनास व महालेखापाल कार्यालयास सादर करावा. तसेच त्यांनी नियंत्रण अधिकारी म्हणून शासन परिपत्रक वित्त विभाग क्र.एयुडी-१०८२/सीआर-९०/८४/कोष-५, दि.२४ सप्टेंबर, १९८६ नुसार सदर निधीच्या खर्चाचा ताळमेळ घालून त्यासंबंधीचे प्रमाणपत्र व सन २०१८-१९ या आर्थिक वर्षाचा संबंधीत लेखा शिर्षाचा विनियोजन लेखा अहवाल दि.३० सप्टेंबर, २०१९ पर्यंत शासनास निश्चितपणे सादर करावा.

४. या योजनेंतर्गत उद्भवणाऱ्या तक्रारींचे निराकरण करण्यासाठी शासन निर्णय दि.०७.१०.२०१५ मध्ये नमूद संबंधित जिल्हयाचे जिल्हाधिकारी यांचे अध्यक्षतेखालील उच्चस्तरीय निवड समितीस प्राधिकृत करण्यात येत आहे.

५. या योजनेंतर्गत होणारा खर्च "मागणी क्र.झेड ई-१, प्रधान लेखाशीर्ष २२३५, सामाजिक सुरक्षा व कल्याण, ०२, समाजकल्याण २००, इतर कार्यक्रम, राज्य योजनांतर्गत योजना (०१) (२१) अल्पसंख्यांक शाळांना पायाभूत सुविधा पुरविणे करिता सहायक अनुदान (२२३५ ए-३४७) ३१ सहायक अनुदाने (वेतनेतर) या लेखाशीर्षाखाली सन २०१८-१९ या वर्षाकरिता मंजूर करण्यात आलेल्या अनुदानातून भागविण्यात यावा. वित्त विभागाचे परिपत्रक क्रमांक-अर्थसं-२०१८/प्र.क्र.६९/अर्थसंकल्प-३, दिनांक २५ जानेवारी, २०१९ अन्वये या योजनेकरीता रु. १६.०० कोटी इतका निधी मार्च, २०१९ अखेरपर्यंत खर्च करण्यास उपलब्ध आहे. या तरतुदीतून चालू आर्थिक वर्षासाठी प्राप्त झालेल्या प्रस्तावानुसार निधी वितरीत करण्यात येत आहे. तसेच वित्त विभागाचे परिपत्रक क्रमांक-अर्थसं २०१८/प्र.क्र.६९/अर्थसंकल्प-३, दिनांक २ एप्रिल, २०१८ मधील नमूद अटींची पूर्तता होत आहे.

६. सदर शासन निर्णय वित्तीय अधिकार नियम पुस्तिका भाग-१ वित्त विभाग, शासन निर्णय क्रमांक विअप्र-१०.०८/प्र.क्र.७०/२००८/विनियम दि.१५.०५.२००९, अन्वये प्रशासकीय विभागास प्राप्त झालेल्या अधिकारांतर्गत/ विभागास वेळोवेळी वित्तीय अधिकार नियमपुस्तिका भाग-२ अन्वये प्रदान करण्यात आलेल्या अधिकारानुसार निर्गमित करण्यात येत आहे

७. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०१९०३१११११००२६९४१४ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Sandesh Chhabu Tadvi

Digitally signed by Sandesh Chhabu Tadvi
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Minorities Development Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=2fde30534317da1ea9bdb3e7bec3c1084d5d608a86e993f8ac0fa02331b77751, serialNumber=b469b3fd61b5201f03b702c0f7fd0ec5cf18beb12425455f4856f44e3d4da763, cn=Sandesh Chhabu Tadvi
Date: 2019.03.11 16:29:59 +05'30'

(सं.छ.तडवी)
सह सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. मा.राज्यपालांचे सचिव,
२. मा.मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव
३. मा. मंत्री/मा.राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव
४. मा.विरोधी पक्षनेता,विधान सभा/विधानपरिषद,महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय,विधानभवन, मुंबई.
५. मा. विधानसभा/ विधान परिषद सदस्य, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, विधानभवन, मुंबई.
६. मा.मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन
७. अपर मुख्य सचिव, नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई.
८. प्रधान सचिव, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई
९. प्रधान सचिव,अल्पसंख्यांक विकास विभाग,मंत्रालय,मुंबई.
१०. महालेखापाल ½ (लेखा व अनुज्ञेयता), मुंबई/नागपूर
११. महालेखापा ½ (लेखापरिक्षा), मुंबई/नागपूर
१२. जिल्हा कोषागार अधिकारी, नाशिक, औरंगाबाद, जालना व वर्धा.
१३. जिल्हाधिकारी, नाशिक, औरंगाबाद, जालना व वर्धा.
१४. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नाशिक, औरंगाबाद, जालना व वर्धा.
१५. जिल्हा नियोजन अधिकारी, नाशिक, औरंगाबाद, जालना व वर्धा.

१६. मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, नाशिक, औरंगाबाद, जालना व वर्धा.
१७. अवर सचिव (अर्थसंकल्प शाखा), अल्पसंख्याक विकास विभाग, मंत्रालय, मुंबई
१८. सह सचिव/उप सचिव/अवर सचिव/कक्ष अधिकारी, अल्पसंख्यांक विकास विभाग,मंत्रालय,मुंबई.
१९. निवडनस्ती.

धार्मिक अल्पसंख्याक विद्यार्थी बहुल शासनमान्य खाजगी अनुदानित/ विना अनुदानित/ कायम विना अनुदानित शाळा, कनिष्ठ महाविद्यालये, औद्योगिक प्रशिक्षण संस्था, नगरपालिका/ नगर परिषद शाळा व अपंग शाळांमध्ये पायाभूत सोयी सुविधा पुरविण्यासाठी अनुदान योजनेंतर्गत अनुदान वितरण सन २०१८-१९ शासन निर्णय क्रमांक अविवि-२०१८/प्र.क्र.१७१/का-६ दि. ०८/०३/२०१९ चे सहपत्र

अ.क्र.	संस्थेचे नाव व शाळेचे नाव	प्रयोजन	अनुदानाचे वर्ष

नाशिक विभाग, जिल्हा-नाशिक.

१.	रहेबार ई तालीम कम्युनिटी, १५, एल.आय.सी. कॉलनी, राजीव नगर, नाशिक द्वारे संचालित रहेनुमा उर्दु माध्यमिक शाळा, मौलाना आझाद बिल्डिंग, घास बाजार, जुने नाशिक-४२२ ००१, जि. नाशिक	प्रयोगशाळा आधुनिकीकरण	४ थे
२.	रहेबार ई तालीम कम्युनिटी, १५, एल.आय.सी. कॉलनी, राजीव नगर, नाशिक द्वारे संचालित रहेनुमा उर्दु माध्यमिक शाळा, वडाळा रोड, नाशिक-४२२ ००६, जि. नाशिक	स्वच्छता गृहांची दुरूस्ती नविन स्वच्छता गृह बांधणे.	५ वे
३.	शेखाणी एज्युकेशन सोसायटी, नगमा बंगला, फातेमा नगर, पखाल रोड, नाशिक, जि. नाशिक द्वारे संचालित मायरॉन इंग्लिश मिडियम स्कुल, सर्व्हे नं. ८६२/२ ए- क्लासिक रो हाऊस जवळ, पखाल रोड, नाशिक, जि. नाशिक.	ग्रीन बोर्ड, टेबल, बेंच, इन्व्हर्टर, इ.	३ रे
४.	अल अन्सार सोशल वेलफेअर अँन्ड एज्युकेशन सोसायटी, मालेगांव, जि. नाशिक द्वारे संचालित मौलाना आझाद प्रायमरी स्कुल, मालेगांव, सर्वे नं.३९/अ, हजार खोली, मालेगांव, जि. नाशिक.	प्रयोगशाळा साहीत्य, एलईडी प्रोजेक्टर, स्मार्ट ग्रीन बोर्ड, होम थिएटर, इ.	५ वे
५.	रहेबर ए तालीक कम्युनिटी, १५, एल.आय.सी. कॉलनी, घास बाजार, राजीव नगर, नाशिक द्वारे संचालित रहेनुमा उर्दु प्रायमरी स्कुल, नाशिक, जि. नाशिक	खेळ साहित्य व साउंड सिस्टिम	५ वे
६.	देहाती शैक्षणिक व सामाजिक संस्था, (ग्रामीण अल्पसंख्यांक) मालेगांव, जि. नाशिक. द्वारे संचालित लोकनेते व्यंकटराव हिरे (उर्दु) प्राथमिक शाळा, रमजानपुरा, दयाने, जि. नाशिक.	ग्रीन बोर्ड, बेंचेस इ.	५ वे
७.	देहाती शैक्षणिक व सामाजिक संस्था, (ग्रामीण अल्पसंख्यांक) मालेगांव, जि. नाशिक. द्वारे संचालित महरहुम आबिद अली, जागिरदार उर्दु प्रायमरी शाळा, रमजानपुरा, दयाने, जि. नाशिक.	ग्रीन बोर्ड, बेंचेस इ.	२ रे
८.	उम्मीद ऑर्गनायझेशन फॉर अप्लीफटमेंट ऑफ मुस्लीम मायनारिटिज एज्युकेशन अँन्ड इकॉनॉमिक डेव्हलपमेंट, ता. मालेगांव, जि. नाशिक. द्वारे संचालित राष्ट्रीय मुक्त विद्यालयाची शिक्षण संस्था, पवारवाडी, मालेगांव, जि. नाशिक	संगणक, प्रिंटर्स, एलईडी, फर्निचर इ.	१ ले
९.	नोबल एज्युकेशन अँन्ड वेलफेअर सोसायटी, बी-७, राज्य कर्मचारी हौसींग सोसायटी, अशोक नगर, सातपूर, जि. नाशिक द्वारे संचालित मदर सुरैय्या, शेख उर्दु हायस्कुल, बी-७, राज्य कर्मचारी हौसींग सोसायटी, अशोक नगर, सातपूर, नाशिक-१२, जि. नाशिक.	संगणक, प्रिंटर्स, बेंचेस, अध्यापनाचे साहीत्य इ.	३ रे
	एकूण रूपये- १८,००,०००/-		

धार्मिक अल्पसंख्याक विद्यार्थी बहुल शासनमान्य खाजगी अनुदानित/ विना अनुदानित/ कायम विना अनुदानित शाळा, कनिष्ठ महाविद्यालये, औद्योगिक प्रशिक्षण संस्था, नगरपालिका/ नगर परिषद शाळा व अपंग शाळांमध्ये पायाभूत सोयी सुविधा पुरविण्यासाठी अनुदान योजनेंतर्गत अनुदान वितरण सन २०१८-१९ शासन निर्णय क्रमांक अविवि-२०१८/प्र.क्र.१७१/का-६ दि. ०८/०३/२०१९ चे सहपत्र

अ.क्र.	संस्थेचे नाव व शाळेचे नाव	प्रयोजन	अनुदानाचे वर्ष

औरंगाबाद विभाग, जिल्हा- औरंगाबाद.

१.	मुलतानी बहुउद्देशिय शिक्षण संस्था, तांडा बाजार सिल्लोड, जि. औरंगाबाद द्वारे संचालित महाराणा प्रताप माध्यमिक विद्यालय, गव्हाली, ता. सिल्लोड, जि. औरंगाबाद	वॉटर कुलर	३ रे.
२.	मुलतानी बहुउद्देशिय शिक्षण संस्था, तांडा बाजार, सिल्लोड, जि. औरंगाबाद द्वारे संचालित स्वा.सै. कै. गंगारामजी मानगर माध्यमिक विद्यालय पिंपळगा पेठ सईद, जि. औरंगाबाद	प्रिंटर आणि इतर साहीत्य.	४ थे .
३.	अल-मुआब्बीर शैक्षणिक व वेलफेअर सोसायटी, द्वारे संचालित औरंगाबाद पब्लीक स्कुल नेहरूनगर, औरंगाबाद	ई-लर्निंग सॉफ्टवेअर	३ रे.
४.	अल मनहल एज्युकेशन सोसायटी औरंगाबाद जि. औरंगाबाद द्वारे संचालित मो. समी उर्दु हायस्कुल मिसारवाडी, औरंगाबाद जि. औरंगाबाद.	बेंचेस व डेस्क	४ थे.
५.	अल फैसल एज्युकेशनल अँन्ड वेलफेअर सोसायटी, औरंगाबाद द्वारे संचालित जिकरा उर्दु प्राथमिक शाळा देवळाई चौक बीड बायपास जि. औरंगाबाद	वॉटर कुलर	३ रे.
६.	विशाल शिक्षण प्रसारक मंडळ, नेहरूनगर, कटकट गेट, औरंगाबाद द्वारे संचालित डॉ. पंतगराव कदम उर्दु प्राथमिक शाळा, जटवाडा रोड, हर्सुल परिसर औरंगाबाद, जि. औरंगाबाद	शाळा खोल्यांची दुरूस्ती.	४ थे.
७.	ज्ञानदिप शिक्षण संस्था, सिडको औरंगाबाद द्वारे संचालित ज्ञानदिप प्राथमिक शाळा, सिडको एन-२, जि. औरंगाबाद	संगणक व प्रिंटर	४ थे.
८.	ज्ञानदिप शिक्षण संस्था औरंगाबाद द्वारे संचालित ज्ञानदिप माध्यमिक सिडको, औरंगाबाद, जि. औरंगाबाद	संगणक व प्रिंटर	३ रे.
९.	अल-हुसैन शिक्षण संस्था, रोशन गेट, औरंगाबाद द्वारे संचालित मोहम्मद मुश्ताक अहेमद उर्दु हायस्कुल, जसवंतपुरा, औरंगाबाद, जि. औरंगाबाद	प्रयोगशाळा साहीत्य.	५ वे.
१०.	डॉ. जफर एज्युकेशन अँन्ड अँग्रो रिसर्च सेंटर औरंगाबाद द्वारे संचालित ताहेरा बेगम उर्दु प्राथमिक शाळा, वाळुंज, औरंगाबाद, जि. औरंगाबाद.	फरशी बसविणे.	५ वे.
११.	अल हुसैन शिक्षण संस्था औरंगाबाद द्वारे संचालित राजीव गांधी उर्दु हायस्कुल, रोशनगेट, औरंगाबाद, जि. औरंगाबाद	प्रयोगशाळा उभारणी.	५ वे.
१२.	सविताबेन एज्युकेशन सोसायटी, औरंगाबाद द्वारे संचालित वंडर गार्टन प्राथमिक शाळा गारखेडा परिसर, औरंगाबाद, जि. औरंगाबाद.	संगणक व प्रिंटर	१ ले.
	एकूण रूपये- २४,००,०००/-		

धार्मिक अल्पसंख्याक विद्यार्थी बहुल शासनमान्य खाजगी अनुदानित/ विना अनुदानित/ कायम विना अनुदानित शाळा, कनिष्ठ महाविद्यालये, औद्योगिक प्रशिक्षण संस्था, नगरपालिका/ नगर परिषद शाळा व अपंग शाळांमध्ये पायाभूत सोयी सुविधा पुरविण्यासाठी अनुदान योजनेंतर्गत अनुदान वितरण सन २०१८-१९ शासन निर्णय क्रमांक अविवि-२०१८/प्र.क्र.१७१/का-६ दि. ०८/०३/२०१९ चे सहपत्र

अ.क्र.	संस्थेचे नाव व शाळेचे नाव	प्रयोजन	अनुदानाचे वर्ष

औरंगाबाद विभाग, जिल्हा- जालना.

१.	गोदावरी एज्युकेशन अँन्ड सोशल वेलफेअर सोसायटी, जालना द्वारे संचालित डॉ. मिर्झा गालीब उर्दु प्राथमिक शाळा दाभाडी, ता. बदनापुर, जि. जालना.	संगणक, प्रिंटर्स व इतर साहीत्य.	४ थे
२.	झेप शैक्षणिक संस्था घनसावंगी, जि. जालना, द्वारे संचलित ज्ञानदिप सिटी अ. विद्यालय, गणपती गल्ली, घनसावंगी, ता. घनसावंगी, जि. जालना	झेरॉक्स मशिन.	३ रे
३.	झेप शैक्षणिक संस्था घनसावंगी, जि. जालना, द्वारे संचलित हजरत अबुबकर सिद्दीकी रजी विद्यालय, महेबुब नगर, घनसावंगी, जि. जालना	झेरॉक्स मशिन.	२ रे
४.	मौलाना अब्दुल कलाम आझाद एज्युकेशन अँन्ड वेलफेअर सोसायटी, धाड, द्वारे संचलित उर्दु हायस्कुल सावंगी, ता. भोकरदन, जि. जालना	प्रयोगशाळा साहीत्य.	५ वे
५.	अखिल महाराष्ट्र ग्रामीण शिक्षण विकास मंडळ, बेरीबाग हर्सुल, औरंगाबाद द्वारे संचलित सावली मतिमंद विद्यालय नांदी , ता.अंबड, जि. जालना	संगणक संच खरेदी करणे.	१ ले
६.	अलहुदा सोशल वेलफेअर सोसायटी, मालेगाव, द्वारे संचालित ईकरा उर्दु हायस्कुल, रांजणी, ता. घनसावंगी, जि. जालना	इन्व्हर्टर, झेरॉक्स मशिन, ई-लर्निंग, एल.सी.डी. इ.	२ रे
७.	गोदावरी शिक्षण संस्था गोंदी, ता. अंबड, जि. जालना द्वारे संचालित अकरम फातेमा इंग्लिश प्रायमरी स्कुल, कुच्चरवटा, जुना जालना, जि. जालना.	डयुल डेस्क.	१ ले
८.	अबुहनिफा एज्युकेशन सोशल अँन्ड वेलफेअर सोसायटी, जि. जालना द्वारे संचालित अबुहनिफा उर्दु प्राथमिक शाळा, संभाजी नगर, जालना, जि. जालना.	पुस्तक खरेदी.	३ रे
९.	चिश्तिया एज्युकेशन अॅड वेलफेअर सोसायटी, दानाबाजार, जालना, द्वारे संचलित इकरा ऊर्दु प्रायमरी स्कुल, कबाडी मोहल्ला, जालना, जि.जालना	फर्निचर.	४ थे
	एकूण रूपये- १८,००,०००/-		

नागपुर विभाग, जिल्हा- वर्धा.

१.	अल-एकरा एज्युकेशन सोसायटी कळंब, जि. यवतमाळ द्वारे संचालित अल्पसंख्यांक शाळा, उर्दु हायस्कुल, शिरपूरे (बोके), ता. आर्वी, जि. वर्धा.	खोली बांधकाम, क्रमिक पुस्तके, फर्निचर इ.	५ वे
	एकूण रूपये- २,००,०००/-		